MHAU060000622004

<u>नियमीत दरखास्त क्र. १०/२००४ मधील नि.क्र. १७६ खालील आदेश</u>
( विठाबाई शंकर भोजणे वि. गोबा लालचंद पवार व इतर )

१. ऋणको यांनी सदर अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, सदर प्रकरणात भुमी अभिलेख कन्नड यांच्याकडुन सर्वप्रथम वाद मिळकतीचे मोजमाप होउन त्यानंतर पुढील आदेश पारीत करण्यात यावे याकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जावर धनको यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, ऋणको यांना सदरचा अर्ज दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. सदर प्रकरणात वरिष्ठ न्यायालयाचे कोणतेही मनाई आदेश नाही. तसेच हुकुमनाम्यासदर्भात अंमलबजावणीनी प्रक्रिया सुरु असताना त्यावर निर्णय घेणे याबाबत न्यायालयास सार्वभौम निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. सबब, ऋणको यांनी सदरचा अर्ज दाखल केल्याने त्यांच्यावर ५०,०००/- रुपये दंड लावुन नामंजुर करण्यात यावे.

३. ऋणको व धनकोतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दरखास्तीत निशाणी १५९, १६२ व १६५ वरील आदेशान्वये सदर प्रकरणात तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कन्नड यांची कोर्ट कमिशन म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणातील निशाणी ८५ कडील पंचनामा व अहवाला प्रमाणे दावा मिळकत मौजे सितानाईक तांडा ता. कन्नड येथील जमीन गट क्र. १२६ ची मोजणी सर्वे मॅन्युअल मधील तरतुदी नुसार व दिसते परिस्थीतीवरुन मोजणी करुन वाद मिळकत धनकोच्या ताब्यात देण्यास मदत करावी असे आदेश पारीत करण्यात आल्याचे दिसुन येते. सदर आदेशाचे विवरण पाहता

सदर दरखास्तीत सदर आदेशान्वये प्रथम कायदयातील तरतुदीप्रमाणे वाद मिळकतीची मोजणी होणे अपेक्षित आहे. सदर प्रकरणात मिळकतीची मोजणी होउन तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कन्नड यांच्याकडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर दरखास्तीतील वाद मिळकतीच्या ताब्या बाबतचे व पोलिस मदतीबाबतचे आदेशाची अंमलबजावणी होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. सदर प्रकरणात तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कन्नड यांच्याकडुन मोजणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर दरखास्तीतील वाद मिळकतीच्या ताब्याबाबतचे व पोलिस मदतीबाबतचे आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**(श्रीमती अ. ई. आवटी)**
**सह, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर**
**(कोर्ट न.२) कन्नड.**

**ठिकाण : कन्नड.**
**दिनांक : ०३.०२.२०२४.**